ISSN 2278-8808
SJIF 2015 = 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# बी. एड एक वर्षाचा अभ्यासक्रम व दोन वर्षाचा अभ्यासक्रम : एक अभ्यास

एस. के. पाटील, Ph.D.
प्राचार्य , श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ एज्युकेशन, कमलापूर. ता. सांगोला जि. सोलापूर
ई-मेल- *sajik.k.patil@gmail.com*

*Scholarly Research Journal's* ***is licensed Based on a work at*** *www.srjis.com*

प्रस्तावना :

भारतामध्ये शिक्षकांना शिक्षण दिले जावे हा विचार वूडच्या खलीत्याने (1854) साली आला. त्यानंतर विविध आयोगांनी आपले प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाबरोबरच येथे शिकवणाऱ्या शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाला महत्त्व दिले . शिक्षक प्रशिक्षण हा एक वर्षाचा अभ्यासक्रम असल्यामुळे 'रात्र थोडी आणि सोंगे फार' अशी अवस्था आहे. वर्षभर इतके उपक्रम प्रात्यक्षिके व अनेक कार्यक्रम असतात की , वर्षभर शिक्षक व विद्यार्थी धावपळच करत असतात. आपले विद्यार्थी सक्षम शिक्षक व्हावेत हीच त्यांची तळमळ असते परंतु अशी तळमळ असणाऱ्या प्रशिक्षण संस्था सुद्धा बोटावर मोजण्या इतक्या आहेत. प्रशिक्षणातील गुणवत्ता, व्यापकता, प्रयोगशीलता , व्यासंग व कृतिशीलता या बाबी दूरच राहिल्या. पण नियमित दिलेला अभ्यासक्रम सुद्धा पूर्ण करण्याची क्षमता नसलेल्या प्रशिक्षण संस्था उदयास आल्या आहेत. त्यांच्याकडे पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने प्रशिक्षणाची अवस्था अत्यंत दयनीय आहे हा गुणवत्ता घसरण्याचा अजून एक स्वतंत्र मुद्दा आहे . आपण फक्त कालावधीचा विचार केला तरी या कोर्सची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये पाहिली असता एक वर्षाचा कालावधी अपुरा पडतो हे लक्षात येते.

बी. एड अभ्यासक्रमाची उद्दिष्टे -

1 . शिक्षक म्हणून आवश्यक ज्ञान प्रशिक्षणार्थ्याला देणे .

2 . शिक्षकास आवश्यक कौशल्य आत्मसात करण्यास मदत करणे .

3 . शिक्षकी पेशाबद्दल आवड निर्माण करणे .

4 . शिक्षक म्हणून अभिवृत्ती तयार करणे .

5 . शिक्षकी पेशाचा व्यासंग लक्षात आणून देणे .

6 . शिक्षकी पेशाबद्दलच्या कर्तव्याचे आकलन करून देणे.

7. शिक्षक म्हणून येणाऱ्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणे .

8 . विद्यार्थ्यांबद्दलची तळमळ निर्माण करणे .

9 . विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र जाणून घेऊन त्याचा वापर करण्यास शिकविणे .

10 . शिक्षकी पेशाचा इतिहास व नवनवीन धोरणे समजावून देणे .

11 . शिक्षकी पेशामधील सामाजिक बांधिलकी समजावून देणे .

12 . अध्ययन अध्यापनासाठी नवीन तंत्रज्ञानाबद्दलच्या वापराचे ज्ञान करून देणे .

13 . शिक्षकी पेशाबद्दलच्या समाजाच्या गरजा व अपेक्षा समजावून देणे .

अशा अनेक गोष्टी आहेत की, ज्यांची व्याप्ती सखोलता मोजता येणार नाही अशा उद्दिष्टांवर आधारित हा बी एड कोर्स असल्यामुळे यासाठी मिळणारा एक वर्षाचा कालावधी प्रत्यक्षात मात्र सात ते आठ महिने प्रशिक्षण कालावधी अतिशय अपुरा आहे त्यामुळे दोन वर्षाच्या बीएड अभ्यासक्रमाची गरज आहे.

**1. शिक्षक प्रशिक्षण प्रवेश प्रक्रियेतील विलंब -**

सध्या सर्व प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन आहेत. एप्रिलमध्ये ही प्रक्रिया सुरू होते जुलैमध्ये पहिली फेरी होते नंतर दुसरी व तिसरी फेरी पूर्ण होईपर्यंत सप्टेंबर महिना येतो वास्तविक जून पासून शैक्षणिक वर्ष सुरू व्हायचे सोडून ते दोन महिने उशिरा सुरू होते त्यानंतर सूक्ष्म अध्यापन व इतर सैद्धांतिक भाग धावत पळत घ्यावा लागतो व कमी कालावधीमध्ये सत्र एक पूर्ण करावे लागते.

**2. विद्यापीठ सत्र परीक्षा नोव्हेंबर डिसेंबर मध्ये-**

आता बऱ्याच विद्यापीठांनी सत्र पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. त्यामुळे पहिली सत्र परीक्षा नोव्हेंबर डिसेंबर या महिन्यात येते. सुरुवातीला प्रवेशाला होणारा विलंब त्यानंतर सूक्ष्म अध्यापन कृतीसत्र ,सरावपाठ सारखे महत्त्वाचे प्रात्यक्षिक हे भाग उरकताना तात्विक भागाला पुरेसा वेळ देता येत नाही ही सद्यस्थिती आहे.

**3 . प्रात्यक्षिक व सैद्धांतिक अध्यापनाला योग्य वेळ देण्यासाठी -**

प्रात्यक्षिकाच्या मागे लागले की सैद्धांतिक भाग मागे पडतो व सैदांतिक भागाच्या मागे लागले की प्रात्यक्षिकात खंड पडतो. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी दोघेही पळापळ होताना दिसते. वास्तविक बीएड मध्ये सैदांतिक भागावर आधारित प्रात्यक्षिक असते व हे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या कृतीत उतरावे ही अपेक्षा असते.

**4 . आय.सी.टी.**

हा सक्तीचा विषय आहे परंतु संगणकांची संख्या 20 च असते तर विद्यार्थी संख्या ८० ते १०० असते त्यांना आयसीटीचे प्रॅक्टिकल करताना जादा तास व जादा बॅचेस पाडण्याची आवश्यकता असते तसे संगणक तज्ञ प्राध्यापक असण्याची सुद्धा आवश्यकता असते. परंतु तसे प्राध्यापक उपलब्ध नसतील तर शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त ताण येतो त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी आयसीटी आत्मसात करेलच असे ठामपणे सांगता येत नाही .

**5. व्यक्तिगत पुरेसे मार्गदर्शन मिळण्यासाठी**

विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्यामुळे वैयक्तिक लक्ष देता येत नाही . तरी विद्यार्थ्यांचे निरीक्षण करून त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध होण्यासाठी कालावधी जास्त असणे गरजेचे आहे. शिक्षक व विद्यार्थी यांच्यात दुहेरी दळणवळण होण्यासाठी व विद्यार्थ्यांना व्यक्तिगत प्रेरणा मार्गदर्शन मिळण्यासाठी दोन वर्षाच्या अभ्यासक्रमाची गरज आहे .

**6 . बदलत्या जागतिकीकरणाच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी**

जागतिकीकरणामुळे जग झपाट्याने बदलत आहे . या बदलत्या जगाचे ज्ञान विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे देऊ शकेल असा शिक्षक तयार करण्यासाठी प्रशिक्षणामध्ये बदल गरजेचा आहे व तसा समर्थ शिक्षक तयार करण्यासाठी बी एड अभ्यासक्रम दोन वर्षाचा करणे गरजेचे आहे..

**7 . व्यावहारिक व आरोग्याचे यथार्थ ज्ञान देण्यासाठी**

शिक्षक हा समाजाचा नेता असतो . समाजातील लोक शिक्षकाकडे एक सल्लागार म्हणून पाहत असतात. त्या समाजातील लोकांना विद्यार्थ्यांना शालेय आवारात व इतरत्र सर्वांना मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षकाकडे सामान्य ज्ञान व्यावहारिक ज्ञान असणे गरजेचे आहे व ते ज्ञान वाढवण्यासाठी योग्य कालावधीची गरज आहे. योग्य अभ्यासाची गरज आहे. तसेच विविध प्रकल्प , व्याख्याने, क्षेत्रभेटी याच्या अनुभवातून हे प्रशिक्षणार्थ्यांना शक्य आहे. म्हणून एक वर्षाचा कालावधी अपुरा पडतो .

**8. छात्रसेवाकालाचा कालावधी वाढवण्यासाठी**

एक वर्षाच्या अभ्यासक्रमात गुणवत्तापूर्ण शिक्षक तयार करण्यासाठी प्राध्यापक प्रयत्न करतात परंतु सराव पाठ छात्र सेवाकाल यामधून शिक्षक तयार होण्यास मदत होते . तर त्याचा कालावधी वाढविण्यासाठी एक वर्षाच्या बीएड चा कालावधी कमी पडतो म्हणून सराव पाठ व छात्रसेवा काल या कार्यक्रमांमध्ये कालावधी वाढवला तर प्रशिक्षणार्थ्यांना चांगला अनुभव घेता येईल व बीएड प्रशिक्षण समृद्ध होईल .

**९ . कृती संशोधन व मूल्यमापनाचे योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी**

एक वर्षाच्या बीएड अभ्यासक्रम पूर्ण करणारा विद्यार्थी छोटे छोटे कृती संशोधन त्याच्या प्रत्यक्ष शालेय जीवनात वापर करेल व आपले अध्ययन अध्यापन सुधारेल अशी अपेक्षा करणे गरजेचे बनले आहे . त्यामुळे विद्यार्थ्यांना कृती संशोधन व्यवस्थित समजावे तसेच आकारिक व सर्वंकष मूल्यमापन श्रेणी द्वारे संकलीत गुणपत्रक अशा नवीन बाबी शालेय अभ्यासक्रमात होत आहेत. त्यांचेही ज्ञान बी.एड. अभ्यासक्रमात प्रशिक्षणार्थ्यांना करून देणे ही काळाची गरज बनली आहे.

**१०. प्रशिक्षणार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकासासाठी**

बरेच प्रशिक्षणार्थी बीएडला येईपर्यंत स्टेजवर येऊन बोलण्यासाठी , सूत्रसंचालन करण्यासाठी , भाषण करण्यासाठी अशा कोणत्याही बाबीसाठी ते समोर आलेले नसतात . परंतु बीएड मध्ये त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात विविध उपक्रम राबविणे हे शिक्षक करून घेत असतो. त्यासाठी प्रेरणा देत असतो. उपक्रमांमध्ये सहभागी करून घेत असतो. त्याचा सराव देत असतो. या सर्व गोष्टींसाठी एक वर्षाचा कालावधी अपुरा पडतो म्हणून दोन वर्षाच्या अभ्यासक्रमाची गरज आहे.

**११. प्रशिक्षणार्थ्यांमध्ये योग्य ज्ञान कौशल्य विकसित करण्यासाठी**

एक शिक्षक म्हणून छात्र शिक्षकांमध्ये आवश्यक गुण ज्ञान व कौशल्य यांचा विकास करण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी दोन वर्षाचा बीएड कालावधी करणे गरजेचे आहे. मूल्यांची योग्य रुजवणूक करण्यासाठी आदर्श नागरिक घडवण्यासाठी अशा प्रकारे सर्वंकष सर्व स्पर्शी व्यवसायानुकूल शिक्षण देण्यासाठी व्यक्तीमध्ये अध्यापकीय व्यक्तिमत्व घडवण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणच योग्य होणे गरजेचे आहे. शिक्षक हा मुलांवर संस्कार करणारा आदर्श नागरिक घडविणारा शिल्पकार असल्यामुळे त्याचे प्रशिक्षण योग्य प्रकारे होणे गरजेचे आहे त्यामुळे दोन वर्षाच्या अभ्यासक्रमामध्ये सुद्धा खालील घटकांवर भर असावा.

१. छात्रसेवाकालाचा कालावधी २. सराव पाठांच्या संख्येतील वाढ .

३. व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम ४ . विविध स्पर्धा मधील प्रशिक्षणार्थ्याचा सहभाग.

५. ज्ञान व कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम. ६. आरोग्य शास्त्र

७. प्रकल्प ८. केस स्टडी (व्यक्तिगत अभ्यास) ९. गटचर्चा १०. कृती संशोधन

११. अवांतर वाचन १२. सर्व शालेय विषयांचे ज्ञान १३ .समाजात वावरण्याची संधी इत्यादी

**एन सी टी इ चे दोन वर्ष बीएड अभ्यासक्रमासाठीचे योगदान**

१९९८ मध्ये प्रथमच गुणवत्तापूर्ण शिक्षक तयार करण्यासाठी दोन वर्षाचा अभ्यासक्रमाचे बीएड असावे असा विचार मांडण्यात आला व एन सी टी ई च्या चार प्रादेशिक संस्थांनी ९ वर्षे आपला दोन वर्षाचा

कार्यक्रम यशस्वीरित्या राबवल्यानंतर असा उदयोन्मुख समाजातील शिक्षक तयार करण्यासाठी जागतिकीकरणाच्या स्पर्धेला तोंड देऊ शकणारा ज्ञान, कार्यक्षमता, व कौशल्य विकसित झालेला शिक्षक निर्माण करणारा शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम तयार केला. त्याचे स्वागतच आहे. यातून सक्षम व गुणवत्तापूर्ण शिक्षक प्रशिक्षण होईल असा विश्वास वाटतो.

संदर्भ सूची**.**

डॉ.दुनाखे अरविंद (एप्रिल 2007) उदयोन्मुख भारतातील समाज शिक्षण व शिक्षक ,नित्य नूतन प्रकाशन पुणे .

डॉ.जाधव मोहन, प्रा. भोसले आरती, प्रा. सर्पोतदार प्राची (ऑक्टोबर 2003) भारतीय शिक्षणाचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.